# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६११ दिनांक ०४.०९.२०२०

## तुळींज पोलीस ठाणे यांचेकडुन हुक्का पार्लर चालविणा-या आरोपीतांवर कारवाई

दि.०२/०९/२०२० रोजी सायंकाळी १९.०० वाजताचे सुमारास तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील नालासोपारा पुर्व अचोळे रोडवरील भरत शॉपींग सेंटरचे पहील्या माळयावरील शॉप नं ०५ व ०६ या गाळयामध्ये व सनशाईन सर्कल येथील घन्सार प्लाझा शॉप नं १ किंग्ज कॅफे येथे हुक्का पार्लर चालु असल्याची गुप्त बातमी मिळाली होती. मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील आरोपीत क्र. १) किसन धर्मेंद्र सिंग वय-२१ वर्षे, व आरोपीत क्र. २) राम अकबाल यादव, वय- २४ वर्ष, यांनी स्वःताचे आर्थिक फायदयाच्या दृष्टीकोनातुन बेकायदेशीर रित्या हुक्का पार्लर साहीत्यासह हुक्का पार्लर चालवीत असतांना तसेच कोरोना रोगाच्या पार्श्वभुमीवर हुक्का ओढतांना तोच रबरी पाईप गिऱ्हाईकांना कोरोना रोगाचा संसर्ग पसरु शकतो हे माहीत असतांनाही त्यांचा जिव धोक्यात टाकुन सदरचे हुक्का पेटवण्यासाठी बंदीस्त रुममध्ये कोणत्याही प्रकाराची आग विझवण्याची साधने उपलब्ध न करता लोकांचा जिव धोक्यात येईल असे हयगईचे वर्तन केले आहे. तसेच आरोपीत क्र. १ यांच्या ताब्यातुन १३,७००/-रु. किंमतीचे व आरोपीत क्र.२ यांचे ताब्यातुन ८,४००/- रु. किंमतीचे हुक्का पार्लरचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. आरोपीत यांचेविरुध्द <u>तुळींज पोलीस ठाणे</u> भा.दं.वि.सं. कलम १८८,२७०,२८५ सह सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणीज्य व्यवहार उत्पादन पुरवाठा व वितरण याचे विनियमन) अधिनियम २००३ चा सुधारीत अधिनियम २०१८ कलम ४ व २१ प्रमाणे, दोन गुन्हे दाखल करण्यात आले असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक/श्री. डी. एस. पाटिल, प्रभारी अधिकारी तुळींज पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner